# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
# अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडल, अमरावती

## जाहिरात क्र. १/२०१७ अंतर्गत सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची सुधारित निवड यादी / प्रतिक्षा यादी

महाराष्ट्र राज्य विद्युत महापारेषण कंपनीच्या अमरावती परिमंडल कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.०१/२०१७ अन्वये सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदांसाठी दि. २०.०८.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेत (ऑनलाईन) उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) पदाची उपलब्ध संख्या व सामाजिक - समांतर आरक्षण इत्यादी बाबी विचारात घेऊन तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांची सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी ही काही अटी व शर्तीच्या अधीन राहून दिनांक १८.०९.२०१७ रोजीच्या सूचनापत्राद्वारे प्रकाशीत करण्यात आलेली होती.

१. त्या अनुषंगाने, तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करीता बोलावून त्यांच्या कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली आहे. कागदपत्र पडताळणीस तात्पुरत्या निवड यादीतील काही उमेदवार उपस्थित न राहिल्यामुळे किंवा कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्यामुळे प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करीता बोलावून पात्रता सिध्द करण्याची संधी देण्यात आली होती. तथापि, प्रतिक्षा यादीतील उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणीस उपस्थित न राहिल्यामुळे किंवा कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरल्यामुळे दिनांक १८.०९.२०१७ रोजीच्या सूचनापत्रातील अट क्र. ६ नुसार सुधारित यादी प्रकाशित करण्यात येत आहे.

२. सुधारित यादीतील निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या इतर माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेली माहिती मूळ प्रमाणपत्रांची / कागदपत्रांची पडताळणीवेळी तपासण्यात येईल.

३. सुधारित यादीत निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, मागास प्रवर्ग, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, अधिवास प्रमाणपत्र ईत्यादी बाबतचे सर्व मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

४. केवळ सुधारित निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक मिळण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ही निवड यादी पुर्णतः जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीनराहून तयार करण्यात आली आहे.

५. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करित नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. उमेदवारांजवळ असलेली पात्रता व सर्व आवश्यक कागदपत्रे ही जाहिरातीत नमूद केलेल्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेले असणे व वैध असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांनी आवश्यक पात्रता व कागदपत्रे ही जाहिरातीत नमूद केलेल्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेली नसतील व वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महापारेषण कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.

७. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदाच्या सुधारित निवड यादीतील उमेदवार हे कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळून आल्यास सुधारित प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादीतील उमेदवारसुध्दा पात्रता व कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्यास त्याखालील गुणवत्ताधारक उमेदवारांची स्वतंत्र निवड / प्रतिक्षा यादी लावण्याचे आधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे.

८. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदाची सुधारित निवड / प्रतिक्षा यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रणदोषामूळे झालेल्या चुका सुधारीतकरून योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार महापारेषण कंपनीने राखून ठेवलेला आहे.

९. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) पदाच्या या सुधारित निवड / प्रतिक्षा यादीत समावेश असलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीच्या पुढील प्रक्रिये संदर्भात परिमंडल कार्यालयाद्वारे कळविण्यात येईल.

१०. सदर सुधारित निवड / प्रतिक्षा यादी ही दि. १८.०९.२०१७ पासुन १ वर्षाकरिता वैध राहील.

११. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदाची सुधारित निवड / प्रतिक्षा यादी खालीलप्रमाणेः-

| Sr. No. | Roll No. | Name of the Candidate | Category | Remarks |
|---|---|---|---|---|
| | | **Select List** | | |
| 01 | 1901090070 | PANKAJ ANKUSH TITARMARE | OBC | Selected against OPEN |
| 02 | 1701090047 | SADDAM MAINODDIN SHAIKH | OPEN | |
| 03 | 1901090052 | SONU RAJESH RATHOD | VJ-(A) | Selected against OPEN-WR |
| 04 | 1401020006 | SAHEBRAO KALU SURYAWANSHI | ST | |
| **Wait List** | | | | |
| 01 | 1101090042 | CHANDRASHEKHAR KAWADUJI NEHARE | OPEN | |
| 02 | 2001020013 | VISHWAMBHAR ARJUN POTE | ST | |
| 03 | 1101090050 | ARTI SANJAY PADALKAR | OBC | Selected against OPEN-WR |

मुख्य अभियंता

दिनांकः- १३.१२.२०१७

अउदा प्रकल्प तथा संवसु परिमंडल, अमरावती

*************